नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील संचालक या अस्थायी पदास मुदतवाढ मिळणेबाबत.
दि. १/३/२०१९ ते दि. ३०/०९/२०१९

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीडीएम-२०१९/प्र.क्र.४९/विशा-८
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक : २५ मार्च,२०१९

वाचावे : १) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : पदनि-२०१६/प्र.क्र. ८/१६/ आ.पु.क., दिनांक २१/०२/२०१९
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीडीएम-६/प्र.क्र.२२८/विशा-८, दि. ८/१०/२०१८
३) संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक : नासंसं/ का-३/३१/प्र.क्र.४/मुदतवाढ/संचालक.२०१९/२३९, दि. १३/०३/२०१९

प्रस्तावना:

नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील संचालक या अस्थायी पदास संदर्भ क्रमांक २ अन्वये दि. १/१०/२०१८ ते दि. २८/२/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढ दि. २८/२/२०१९ रोजी संपली आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक २१/२/२०१९ अन्वये आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच, यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१/०३/२०१९ ते दि. ३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना देण्यात आले आहेत. संचालक या अस्थायी पदास दि. ०१/०३/२०१९ ते दि. ३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील संचालक या अस्थायी पदास दिनांक ०१/०३/२०१९ ते दि. ३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. या पदांवर होणारा खर्च मागणी क्र.बी.-१ मुख्य लेखाशीर्ष "२०७०-इतर प्रशासनिक सेवा (१०६) नागरी संरक्षण (तीन) राज्य नागरी संरक्षण संघटना-०१ वेतन " या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा. सदरचा खर्च चालु वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पीय मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/आ.पु.क., दिनांक २१/३/२०१९ अन्वये अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२५१२२९४५३३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Devendra H Chandel

Digitally signed by Devendra H Chandel
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c549ded25d1b7c2e39965e487e51d076e84ce591bc4a9b2667d265c3acc92c34, serialNumber=160effd4b3ee7de44c6eef773c2eb99bb47e324ec7a549a132930080fdff831d, cn=Devendra H Chandel
Date: 2019.03.25 12:33:24 +05'30'

(देवेंद्र चंदेल)
कार्यासन अधिकारी,
महाराष्ट्र शासन

प्रत :

१. संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६. वित्त विभाग (व्यय-८)/वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय,मुंबई.
७. निवड नस्ती, विशा-८ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.